SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
दूरध्वनी : ( ईपीएबीएक्स) 0091-0231-2609000 परीक्षा नियंत्रक कार्यालय : 0231-2609067
'A' Re-accrediated by NAAC बी.ए. परीक्षा विभाग : 0231-2609116 फॅक्स : 0091-0231-2690655

---

Ref.: - SU/EXAM/BA/SRK/6186 Date : 30/3/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत कला महाविद्यालये,

विषय :- खेळाडू विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलतीबाबत व परीक्षेबाबत.
संदर्भ :- SU/On Exam./Dy.R./2086, dated 9 August, 2011.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र व विषयास अनुसरुन आदेशान्वये कळविण्यात येते की क्रिडा स्पर्धेसाठी बाहेरगावी जाणा-या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा नंतर घेतली जाते, त्यासाठी महाविद्यालयाकडून अशा विद्यार्थ्यांची माहिति विहीत नमुन्यात मागविली जाते. ऑक्टो/नोव्हें २०१४ च्या परीक्षेचे नियोजन करण्यासाठी महाविद्यालयांकडून मागविण्यात आलेल्या माहितीमध्ये खालील त्रटी दिसून आलेल्या आहेत.

१ विद्यार्थ्यांनी बैठक क्रमांक व पीआरएन नंबर लिहीलेले नाहीत.

२ मूळ वेळापत्रकाप्रमाणे कोणते विषय दिलेले आहेत व कोणते विषय नंतर देणार आहे याची माहिती लिहीलेली नाही.

३ जे विषय देणार आहे त्याचे कोड नंबर लिहीलेले नाहीत.

४ काही विद्यार्थ्यांनी सेमि. १ ची परीक्षा देणार आहे असे लिहीलेले आहेत पण विषय लिहीलेले नाहीत.

५ काही महाविद्यालयांनी स्पर्धा व परीक्षा झालेनंतर २० दिवसांनी माहिती सादर केलेली आहे.

६ काही विद्यार्थ्यांनी माहिती तक्त्यातील रकान्यापैकी फक्त दोनच रकाने लिहीलेले आहेत इतकी अपूरी माहिती लिहीलेली आहे व ती तशीच महाविद्यालयाने विद्यापीठाकडे पाठविलेली आहे.

७ काही विद्यार्थ्यांनी सत्र २ लिहीलेले आहे पण विषय सत्र ३ चे लिहीलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे चूकीची व अपूरी माहिती महाविद्यालयांनी पाठविलेली आहे. तेव्हा आदेशान्वये कळविण्यात येते की येथुनपुढे खेळाडुंची माहिती पाठवितांना विद्यार्थ्यांचे पत्र, प्रपत्र १ व २ मध्ये पूर्ण व बिंचूक माहिती भरुन खेळाडू स्पर्धेस जाण्यापूर्वी विद्यापीठामध्ये पाठवावी.

अपूरी किंवा चूकीची माहिती तसेच माहिती उशिरा पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे परीक्षेचे नियोजन केले जाणार नाही याची नोंद घ्यावी व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस विद्यार्थी स्वत: व महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
सहा. कुलसचिव (परीक्षा)

सोबत : वरीलप्रमाणे